# प्रकरण **15 – (**नियमपुस्तिका **- 14)**

## कामे पार पाडण्यासाठी आखून दिलेल्या प्रमाणपध्दती / नियम

# प्रकरण 15 – (नियमपुस्तिका - 14)

## <u>कामे पार पाडण्यासाठी आखून दिलेल्या प्रमाणपध्दती / नियम</u>

15.1 कृपया खात्यामार्फत आखून दिलेली विविध कामे / कार्यक्रम पार पाडण्यासाठी दिलेल्या प्रमाणपध्दती/ नियम याबाबतची माहिति पुरविण्यात यावी.

1. कंत्राटदारांकडून नवीन नोंदणीकरण व नूतनीकरणाकरिता, श्रेणीवाढ करण्याकरिता आवश्यक त्या कागदपत्रांसह प्राप्त झालेल्या आवेदनांची छाननी कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण) कक्ष यांच्याद्वारे केली जाते . त्याचे पूर्णतः अनुपालन केल्यावरच आठवड्याच्या दर गुरुवारी नोंदणीकरण छाननी समितीची सभा आ योजित केली जाते . कागदपत्राच्या सत्यता पडताळणीसापेक्ष नोंदणीकरण छाननी समिती आपल्या अभिप्रायासह सक्षम अधिकार्यांच्या मंजूरीसाठी अर्ज सादर करते ('स्थापत्य' संवर्गातील वर्ग-I(अ) व यांत्रिकी व विद्युत संवर्गातील वर्ग-अ करिता). सक्षम अधिकारांच्या मंजूरीसापेक्ष , योग्य ते नोंदणी शुल्क भरल्यानंतर कंत्राटदारांना नोंदणीकरणाची विधीग्राह्यता पाच कॅलेंडर वर्षाकरिता दिली जाते . त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण ) कक्षातर्फे कंत्राटदा रांना नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित केले जाते.

2. नोंदणीकृत कंत्राटदारांकडून संविधान बदलाबाबत , पत्ता बदलणेबाबत , कंपनीचे नाव बदलण्याबाबत आवश्यक त्या कागदपत्रांसह प्राप्त झालेल्या आवेदनपत्रांची छाननी कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण ) कक्ष यांच्याद्वारे केली जाते . त्याचे पूर्णतः अनुपालन केल्यावरच कार्यकारी अभियंता (सं. व नों.) कक्ष यांना मंजूरीकरीता सादर केले जातात . का. अ. (सं. व नों .) कक्ष यांची मंजूरी घेतल्यावर कंत्राटदारास आवश्यक ती नोंद घेऊन कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण) कक्षातर्फे नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित केले जाते.

3. बृहन्मुंबई महानगरपालिकेत सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांकडून नोंदणी करणाकरिता आवश्यक त्या कागदपत्रांसह प्राप्त झालेल्या आवेदनपत्रांची छाननी कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण) कक्ष यांच्याद्वारे केली जाते. त्याचे पूर्णतः अनुपालन केल्यावरच कार्यकारी अभियंता (सं. व नों.) कक्ष यांना मंजूरीकरीता सादर केले जातात . का. अ. (सं. व नों.) कक्ष यांची मंजूरी घेतल्यावर व आवश्यक ते शुल्क अदा केल्यानंतर सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण) कक्षातर्फे नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित केले जाते.